# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

**मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ / फाल्गुन ५, (शके)**

२२. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२६ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे सुरु झाले आहे. सदर अधिवेशनाकरिता मा.मंत्री महोदयांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्याकरिता मा.सभापतींनी नेमून दिलेले दिवस दर्शविलेला चक्रानुक्रम दिनांक २२ डिसेंबर, २०२५ रोजी मा.सदस्यांना वितरीत करण्यात आला आहे. आता मंत्रिमंडळाच्या खातेवाटपात बदल झाला असून मा.मुख्यमंत्री यांचेकडे "वित्त व नियोजन (रोजगार हमी योजना वगळून) " तसेच श्रीमती सुनेत्रा अजित पवार, मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे "राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ" या विभागांचे कामकाज सोपविण्यात आले आहे. सदर विभागांच्या मंत्री महोदयांचा विधानपरिषद सभागृहात तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी चक्रानुक्रमातील गट क्रमांक १ मध्ये समावेश आहे.

तसेच महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या मंगळवार, दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत सन २०२६ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाचा कालावधी सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ ते बुधवार, दिनांक २५ मार्च, २०२६ असा निश्चित करण्यात आला आहे. तसेच सदर बैठकीत शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजी सभागृहाची बैठक घेण्याबाबत तसेच सोमवार, दिनांक २ मार्च, २०२६ रोजी सभागृहाची बैठक न घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार सोमवार, दिनांक २ मार्च, २०२६ रोजीची गट क्रमांक १ ची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजी सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येईल. गट क्रमांक १ मध्ये (१) मुख्यमंत्री ( वित्त व नियोजन (रोजगार हमी योजना वगळून)) (२) उपमुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)), उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ) (३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री (४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री (५) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री यांचा समावेश आहे.

**विधान भवन,**
**मुंबई.**
**दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२६**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव ३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

**याची प्रत :-**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व मा. सदस्य

२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.

३) महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व पक्ष कार्यालये.

४) संगणक कक्ष (website)

५) MKCL कक्ष.